गोपनीय

जा.क्र.जिविशा/२००१- ५०७९
पोलीस अधीक्षक कार्यालय पुणे ग्रामीण
पुणे -८. दि. १५/१०/२००१

23 OCT 2001
Crime Branch
Date of Receipt :-
Addl. C.P. CR.:-
Inward No. :- 8902
Branch :-

प्रति,
मा.पोलीस आयुक्त,
पुणे शहर.
पुणे.

(लक्षवेध-श्री.संजय वर्मा, पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा,पुणे शहर)

विषय :- श्री. मिलींद रमाकांत एकबोटे, वय ४२ रा. शिवाजीनगर,पुणे,अध्यक्ष धर्मवीर संभाजी महाराज प्रतिष्ठान यांचेविरुध्द एम.पी.डी.ए.ॲक्टखाली प्रतिबंधक कारवाई करणेबाबत.

महोदय,

वरील विषयान्वये सादर की, सोरटी सोमनाथ येथील मंदिराचे जिर्णोध्दारास ५० वर्षे पुर्ण झाल्याचे निमित्ताने सासवड येथील संगमेश्वर मंदिरात दि. ७/१०/२००१ रोजी जलाभिषेकाचा कार्यक्रम विश्व हिंदु परिषदेतर्फे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. मिलींद रमाकांत एकबोटे, रा. शिवाजीनगर,पुणे,अध्यक्ष धर्मवीर संभाजी महाराज प्रतिष्ठान यांना निमंत्रित करण्यात आलेले होते. तसेच त्याच दिवशी सासवड येथील नागरिकांचे वतीने नवी दिल्ली येथील जामा मशिदीचे शाही इमाम बुखारी यांनी मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे बाबत दि. २८/९/२००१ रोजी नमाजाचे वेळी केलेल्या वक्तव्याचे निषेधार्थ मोर्चाचे आयोजन केले होते. परंतू पुणे ग्रामीण जिल्हयामध्ये मुं.पो.का.क. ३७(१)(३) चे आदेश जारी असलेने पोलीसांनी मोर्चा न काढणेबाबत संयोजकांना आवाहन केल्याने त्यानुसार मोर्चा न काढण्याचे संयोजकांनी मान्य केले होते. जलाभिषेक व मोर्चाचे ठिकाण एकच होते. दि. ७/१०/२००१ रोजी जलाभिषेकाचा कार्यक्रम शांततेत पार पडला. परंतू त्यानंतर तेथे कार्यक्रमासाठी जमलेल्या लोकांनी अचानक मोर्चा काढण्याचा प्रयत्न केला असता पोलीसांनी त्यांना अटकाव केला. त्याची परिणीती म्हणजे सर्व जमाव बाहेर येवून मोर्चाने सासवड गावातील दफनभूमीकडे गेला व त्यांनी दफनभूमी तसेच इदगाह यांची मोडतोड करुन गावातील मुस्लीम धर्मियांची घरे व दुकाने जाळली. श्री. मिलींद रमाकांत एकबोटे हे जलाभिषेकाच्या कार्यक्रमानंतर भाषण करुन परस्पर निघून गेले. असे असले तरी ते वरील घटनेस कारणीभूत आहेत, कारण जलाभिषेकाच्या जागेपासून तेथे जमलेल्या लोकांनी मोर्चा काढला होता.

वरील घटनेचे संदर्भात श्री.एकबोटे यांना सासवड पो.स्टे. येथे दाखल गुरनं. ७५/२००१ भा.द.वि.कलम १४३,१४७,१४८,१४९,३३३,३५३,३३२,४३५,२९७,११६,१५३(अ) चा १ (अ)(ब)(क) व २ आणि ५०५(२)(१)(ख)(ग) व मुं.पो.का.कलम १३५, प्रेस ऑफ रजिस्टेशन बुक ॲक्ट १८६७ से. ३ आर/डब्ल्यु १२ या गुन्हयात दि. ९/१०/२००१ रोजी ००.३० वा. अटक करण्यात आलेली आहे.

सध्या एकबोटे यांना सातारा शहर पोलीस स्टेशन गुरनं.२१४/२००१ भा.द.वि.क. १४३,१४७,३४१,१८६ इत्यादी या गुन्हयात दि. ११/१०/२००१ रोजी ट्रान्सपर करुन सातारा पोलीसांनी अटक केलेली आहे.

www.cjp.org.in

जातीय स्वरुपाचे अनेक गुन्हे श्री. एकबोटे यांचेविरुध्द पुणे शहर व सातारा जिल्हा इत्यादी ठिकाणी दाखल असल्याचे समजते.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील सध्याचे युध्दजन्य परिस्थितीचा फायदा घेवून स्वत: पडद्याआड राहुन श्री. एकबोटे हिंदु-मुस्लीम समाजामध्ये दुरावा निर्माण करण्याची शक्यता वाटते श्री. एकबोटे हे कट्टर हिंदुत्व मुलतत्ववादी असून, ते जर या सध्याचे परिस्थितीत जामीनावर सुटे झाले व बाहेर मोकळे राहीले तर नक्कीच परिस्थितीचा फायदा घेवून ते दंगली घडवून आणून समाजात अशांतता निर्माण करणेस कारणीभूत ठरु शकतील.

श्री. एकबोटे हे पुणे शहर हद्दीत राहणेस असून, आपले कार्यालयामार्फ त्यांचेविरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टी दादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालणेबाबत अधिनियम, १९८१ चे अनुसार अथवा दुसरी योग्य ती परिणामकारक प्रतिबंधक कार्यवाही होणेस विनंती आहे.

(डॉ.माधव सानप)
पोलीस अधीक्षक,पुणे ग्रामीण.

प्रत सविनय सादर :-

मा.आयुक्त,
राज्य गुप्तवार्ता विभाग,
म.राज्य,मुंबई.
मा.विशेष पोलीस महानिरीक्षक,
कोल्हापूर परिक्षेत्र,कोल्हापूर.

www.cjp.org.in

**कायार्लयीन टिपणी**

पी.सी.बी.
दिनांक :- ३०/१० / २००१

**विषय:- इसम नामे - मिलींद रमाकांत एकबोटे रा.११७०/३३, शिवाजी नगर पुणे याचेवर एम.पी.डी.ए.कायदयाखाली प्रतिबंधक कारवाई करणे बाबत**

| अ.क्र. | तपशील | संकीर्ण |
|---|---|---|
| | **मा. सादर** | |
| | निवेदन इसम नामे मिलींद रमाकंत एकबोटे वय ४२ रा.११७०/३३ शिवाजी नगर पुणे यास महाराष्ट्र झोपडपटटी दादा, हातभटटीवाले, औषधीद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याचा अधिनियम सन.१९८१ (सुधारणा १९९६) अन्वये स्थानबध्द करण्याकरीता पोलीस निरीक्षक डेक्कन पोलीस स्टेशन पुणे यांनी सहा. पोलीस आयुक्त डेक्कन विभाग व पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ यांचे मार्फतीने प्रस्ताव इकडील कार्यालयात पाठविला असून तो पताका 'अ' येथे दाखल आहे. | पताका "अ" |
| | इसम नामे मिलींद रमाकंत एकबोटे वय ४२ रा.११७०/३३ शिवाजी नगर पुणे हा पुणे शहरातील रहाणारा असून त्याचे शिक्षण बी.एस.सी.पर्यंत झालेले आहे. तो शिवप्रताप भूमी मुक्ती आंदोलन या संस्थेचा संस्थापक व धर्मवीर संभाजी महाराज प्रतिष्ठान या संस्थेचा अध्यक्ष आहे. या दोन्ही संस्थेच्या/संघटनेच्या माध्यमातून कामे करत असताना तो पुणे शहर, पुणे जिल्हा, सातारा जिल्हा या भागातील काही हिंदू तरुणाना एकत्र करुन त्यांना हिंदू धर्मा संबंधीच्या इतिहास कालीन गोष्टी सांगून तसेच छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर याच्या संबंधीचा इतिहास विकृत स्वरुपात सांगून हिंदू तरुणांना मुस्लीम समाजाचे विरुध्द भडकावून समाजामध्ये जातीय तणाव निर्माण करण्याचे काम तो सतत करीत असतो. त्याकरिता तो प्रतापगड येथील अफजलखान मेमोरियल ट्रस्टला देण्यात आलेली जमीन शासनाने ताब्यात घ्यावी, सोरटी सोमनाथ मंदिराचे जिर्णोध्दारास ५० वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने जलाभिषेक व मिरवणूक काढणे पुण्यातील शुक्रवार पेठेतील मध्यवस्तीत असलेल्या सुभानशा दर्गा हा रस्त्यामध्ये मध्यभागी असल्याने वाहतुकीस अडथळा होतो. असे निमित्त करुन तो हलविण्यासंबंधी प्रयत्न करणे, | |

www.cjp.org.in

पुणे शहराचे काही भागात होत असलेल्या कथित गाईच्या हत्ये बाबत मुस्लीम लोकांना धमकावणे, ६ डिसेंबर हा दिवस आनंदोत्सव म्हणून साजरा करुन मंदिरांमध्यं घंटानाद करणे अशा प्रकारच्या घटनांबाबत तो हिंदू समाजातील तरुणांना एकत्र करुन त्यांना तो सतत मुस्लीमांचे विरोधात भडकावीत असतो. त्याच्या या अशा प्रकारच्या हालचालीमुळे पुणे शहर, पुणे जिल्हा व सातारा जिल्हा या भागामध्ये हिंदू व मुस्लीम यांच्यामध्ये जातीय संघर्षाचे स्वरुप निर्माण झालेले आहे. त्यांच्या अशा या जातीयवादी कृत्यांना वेळीच पायबंद घालणे आवश्यक आहे.

त्यांच्या अशा जातीय वादी कृत्यासबधात दाखल असलेल्या गुन्हयांची माहिती पुढील प्रमाणे :-

| अ.नं. | पो.स्टे. | गुरनं/कलम | गुन्हयाची निर्गती | कोर्ट केस नं. |
|---|---|---|---|---|
| १ | डेक्कन | ८१२/९०,भादंवि १५३(अ)(ब),३४ | न्यायप्रविष्ठ | ४३५/९२, २९.९.९२ |
| २ | डेक्कन | ५४८/९१,भादंवि १४३,३३६,४२७,१२०(ब) | न्यायप्रविष्ठ | २६००/९१, १८.९.९१ |
| ३ | खडक | १३३/२००१, भादंवि१४३,१४७,१४८,१४९,४५२,४२७, ३२३, मुंपोॲ.क.३७(१),१३५ | न्यायप्रविष्ठ | ८९/२००१, १४.६.०१ |
| ४ | डेक्कन | ३६८/०१,भादंवि ३४१,३४ | न्यायप्रविष्ठ | /२००१ २५/१०/२००१ |
| ५ | सातारा शहर | २१४/०१, भादंवि क.१४३,१४७,३४१,१५१,१८६ | तपासावर | -- |
| ६ | सासवड | ७५/०१, भादंवि१४३,१४७,१४८,१४९,३३३,३३२,३५३, ४३५,२९७,११६,१५३(अ), १(अ)(ब)(क), व २ आणि ५०५(२)(१)(ख)(ग) व मुंपोॲ क.१३५ तसेच प्रेस ऑफ रजिस्ट्रेशन बुक ॲक्ट ३. | तपासावर | -- |

याप्रमाणे नि.स्था.इसम यांचेविरुध्द गुन्हे दाखल आहेत.

नि.स्था.इसम याचे विरुध्द चॅप्टर केस क्रमांक २४३/२००१, सीआरपीसी १०७ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती.

वरील नियोजित स्थानबध्द इसम याचे विरुध्द अलीकडच्या काळात दाखल असलेल्या गुन्हयांची सविस्तर माहिती पुढील प्रमाणे.

१) खडक पो.स्टे.गु.र.नं.१३३/२००१,

भादंवि कलम १४३,१४७,१४९,४५२,४२७,३२३, मुंपोर्अ कलम ३७(१), १३५.

यातील फिर्यादी श्री.सुधीर शंकर साबळे रा.२० व गुलटेकडी पुणे हे दि.७/६/२००१ रोजी ११.१० वा.त्यांचे १०५, भवानी पेठ पुणे येथील साबळे वाघीरे कंपनीत असताना नि.स्था.इसम नामे मिलींद रमाकांत एकबोटे रा.११७०/३३, शिवाजी नगर पुणे हा आपले १६ साथीदारासह तेथे आला व फिर्यादी यांचे कारखान्यात तयार होणारे बिडीस असलेले 'संभाजी बिडी' हे रजिस्टर नाव काढून टाकावे म्हणून कार्यालयात घुसून मोडतोड करुन बिडयांचे बंडल जाळून टाकून १५,०००/- चे नुकसान केले. वरील झाले प्रकाराबाबत खडक पो.स्टे.येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयात नि.स्था.इसम यास दि. ७/६/२००१ रोजी १२.१५ वा. अटक करण्यात आली असून. त्यास दि. ७/६/२००१ रोजी कि.रु.५०००/- चे जामिनावर मा.प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी शिवाजी नगर कोर्ट पुणे यांनी खुले केले होते. सदर गुन्हयाचा तपास पूर्ण झाले नंतर नि.स्था.इसम व त्याचे १६ साथीदार यांचे विरुध्द दिनांक १४/६/२००१ रोजी दोषारोप पत्र पाठविण्यात आले असून त्याचा सीसी क्रमांक आर.८९/२००१ असा आहे.

२) सातारा शहर पो.स्टे. गु.र.नं. २१४/२००१

भादंवि कलम १४३,१४७,३४१,१५१,१८६ :-

दिनांक ९/७/२००१ रोजी १२.०० वा.चे सुमारास पोवई नाका सातारा येथील प्रतापगड उत्सव समितीचे व शिवप्रताप भूमी मुक्ती आंदोलन तसेच इतर हिंदुत्ववादी संघटनेचे वतीने प्रतापगड येथे असणारे अफझलखान मेमोरियल ट्रस्टला देण्यात आलली जमिन शासनाने ताब्यात घ्यावी. तसेच त्याचा करार संपल्याने नूतनीकरण करण्याकरिता परवानगी देण्यात येवू नये या मागण्यांकरिता वरील हिंदुत्ववादी संघटनांचे वतीने जिल्हाधिकारी कार्यालय सातारा येथे मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. वरील हिंदुत्ववादी संघटनांचे कार्यकर्त्यांनी पोवई नाका सातारा येथे असलेल्या शिवाजी महाराजांचे पुतळयास पुष्पहार

www.cjp.org.in

बाजूस १३.०० वा.पोहचले त्यावेळी त्या मोर्चाचे नेतृत्व नमूद नि.स्था.इसम याने केले होते. त्यावेळी मोर्चामध्ये २०० ते २५० लोक होते. त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाचे पाठीमागील गेटचे जवळून जाणारे पोवई नाका ते गोडोली सातारा या रस्त्यावर बसून व उभे राहून रस्ता अडविला व जाणारे/येणारे वाहनांना व नागरिकांना प्रतिबंध केला. त्यावेळी त्यांना तेथे हजर असणा-या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी रस्ता अडविण्याचे कृत्य हे बेकायदेशीर आहे असे सांगितले त्यावेळी त्यांनी त्या गोष्टीकडे जाणीवपूर्वक दूर्लक्ष करुन रस्ता अडविला. तसेच त्यावेळी त्यांनी हिरवे कापडाचा तुकडा रस्त्यावर जाळून बेकायदेशीर कृत्यांचा अवलंब केला. झाले प्रकाराबाबत श्री. एन.एम.जाधव पोलीस उप निरीक्षक सातारा शहर पो.स्टे.यांनी फिर्याद दिली असून त्याबाबत वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात नि.स्था.इसम यास दिनांक १२/१०/२००१ रोजी १७.२० वा.अटक करण्यात आली असून त्यास दि. १५/१०/२००१ रोजी मा.कोर्टाने वैयक्तीक जातमुचलक्यावर जामिनावर खुले केले आहे. सदर गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

३) डेक्कन पो.स्टे.गुरनं ३६८/२००१, भादंवि कलम ३४१,३४

दिनांक ८/९/२००१ रोजी फिर्यादी श्री.इलियास खाजा सौदागर उर्फ कुरेशी रा.९०४, कसबा पेठ पुणे यास त्याचा मालक शकील कुरेशी यांनी मुं. पो. म्हाळुंगे ता.हवेली जि.पुणे येथे भानुदास कसबे यांचेकडे खरेदी केलेले ४ बैल ठेवले आहेत ते बैल मार्केट यार्ड येथील बाजारात विक्रीसाठी घेवून या से सांगितले. त्या प्रमाणे फिर्यादी व त्यांचा पुतण्या रियाज असे महाळुंगे येथून ४ बैल घेवून येत असताना गुडलक चौक येथे दुपारी १४.०० वा चे सुमारास नि.स्था.इसम नामे मिलींद एकबोटे व त्यांचे दोन साथीदार यांनी आडवून तुम्ही मला ओळखत नाही का ? मी मिलींद एकबोटे आहे. तुम्ही ही जनावरे घेवून डेक्कन पो.स्टे.येथे चला. त्या प्रमाणे फिर्यादी हे त्यांचेसह डेक्कन पो.स्टे.येथे गेले. याबाबत फिर्यादी यांनी नि.स्था. इसम याचे विरुध्द आपण बैल घेवून मार्केट यार्ड कडे जात असताना आम्हाला तिकडे जावू न देता डेक्कन पो.स्टे. येथे घेवून गेले. सदर झाले प्रकारा बाबत फिर्यादी श्री.इलियास खाजा सौदागर उर्फ कुरेशी यांनी फिर्याद दिली असून ती वरील प्रमाणे दाखल आहे. सदर गुन्हयामध्य नि.स्था.इसम मिळून न आल्याने त्याच विरुध्द दि.२५/१०/२००१ रोजी मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ए.सी.कोर्ट पुणे येथे दोषारापपत्र सादर करण्यात आले आहे. त्याचा सीसी नं. ४०९३/२००१ असा आहे. सदरचा गुन्हा हा न्याय प्रविष्ठ आहे.

www.cjp.org.in

४) सासवड पो.स्टे.गुरनं ७१/२००१,

भादंवि कलम १४३, १४७, १४८, १४९, ३३३, ३५३, ३३२, ४३५, २९७, ११६, १५३(अ)(ब)(क) व २ आणि ५०५ (२)(१)(ख)(ग) मुंपोॲ कलम १३५ तसेच प्रेस ऑफ रजिस्ट्रेशन बुक्स ॲक्ट १८६७ कलम ३.

दिनांक ७/१०/२००१ रोजी संगमेश्वर मंदिर सासवड या ठिकाणी सकाळी ०८.०० वा चे सुमारास विश्व हिंदू परिषदेचे सुमारे ५० ते ६० कार्यकर्ते आले व त्यांनी मंदिरात जलाभिषेकाचा कार्यक्रम सुरु केला. तो कार्यक्रम १०.०० वा संपलेनंतर सदर मंदिरात सभा सुरु झाली. सभेमध्ये नि.स्था.इसम याने भाषण केले. सदरचे भाषण त्याने जहाल व प्रक्षोभक अशा स्वरुपाचे केले व तेथे जमलेल्या लोकांच्या धार्मिक भावना भडकाविल्या. त्या ठिकाणी जमलेले लोक हे एकाच दिशेने अमर चौकातून नगरपालिकेपर्यंत येवू लागले. त्यात आणखी लोकांची भर पडली. सदरचा जमाव ८०० ते १००० लोकांचा झाला. सदरचा जमाव हा गराडे रोडने कब्रस्थान मध्ये शिरला व तेथील मशिदीची मोडतोड करुन तो जमाव विध्वंसक होवून दगडफेक करीत होता. त्यावेळी तेथे असलेल्या पोलीसांनी त्यांना शांत रहाण्याचे अवाहन केले असता त्यांनी पोलीसावर दगडफेक केली. त्यावेळी काही पोलीस जखमी झाले. त्यावेळी पोलीसांनी लाठीहल्ला केला. तसेच जमावातील काही लोकांनी सासवड गावातील हडको वसाहत, एस.टी.स्टॅड परिसर, हिवरे रोडवरील ईदगाह मैदान या ठिकाणी दगडफेक करुन जाळपोळ करुन नुकसान केले. श्री.गनीभाई बागवान वगैरे १२ ते १४ मुस्लीम समाजाची घरे व उपजिवीकेचे साधन असणारे दुकान यांची जाळपाळ व नासधूस केली. सदर झाले प्रकाराबाबत श्री.एन.एस.भोसले पाटील सपोनि सासवड पो.स्टे.यांनी फिर्याद दिली असून ती वरील प्रमाणे दाखल आहे. वरील गुन्हयात नि.स्था.इसम दि. ८/१०/२००१ रोजी ००.३० वा. अटक करण्यात आली असून त्यास दि. ९/१०/२००१ रोजी मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधि री सासवड कोर्ट पुणे यांचे समोर हजर करण्यात आले.

सदरचा गुन्हा हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

वरील अ.नं.४ हा गुन्हा झालेनतर सासवड भागात दंगा, गर्दी, मारामारी, दगडफेक, जाळपोळ असे प्रकार होवून सुमारे ४४ लाख रुपयांचे खाजगी व सरकारी मालमत्तेचे नुकसान झाले. सदर प्रकारास नि.स्था. इसम याने केलेले प्रक्षोभक भाषण व त्या नतर त्याने पसरविलेल्या अफवा याच सदरच्या जातीय दंग्यास कारणीभूत आहेत असे दिसून येते.

www.cjp.org.in

वरील प्रकार झाले नंतर त्या भागामध्ये संचारबंदी लागू करण्यात आली होती. तसेच तेथील शांतता व सुव्यवस्था अत्यंत तणावपूर्ण अशा अवस्थेत राहून त्या भागातील मुस्लीम धर्मीय लोकांचे मनात भिती व दहशत निर्माण झाली होती. व नि.स्था.इसम याचे भितीने काही लोक आपली राहती घरे व दुकाने सोडून निघून गेले होते.

पोलीस निरीक्षक डेक्कन पो.स्टे.यानी केलेल्या गोपनीय चौकशी मध्ये स्थानबध्द इसम हा दहशत निर्माण करणारा इसम असल्याचे दिसून आले असून त्याचे भिती पोटी व तो करीत असलेल्या दोन धर्मामधील तेढ निर्माण करणा-या कृत्यामुळे कोणीही नागरिक त्याचे विरुध्द तक्रार देण्यासाठी पुढे येत नाही. बरेचशे नागरिक त्यांच्या दबावाखाली वावरत असतात. त्यांच्या दहशतीस व कृत्यास बळी पडलेल्या काही लोकांना पोलीस निरीक्षक डेक्कन पो.स्टे.यांनी विश्वासात घेवून त्यांची नावे व पत्ते गुप्त रहील अशी हमी दिल्याने काही लोकांनी जबाब दिले असून ते जबाब गोपनीय रित्या पध्दतीने नोंदविलेले आहेत. त्याची फेर तपासणी सहा.पोलीस आयुक्त डेक्कन विभाग यांनी केलेली आहे.

तसेच नि:स्था इसम व त्याचे हजर साथीदार हे कोंढवा येथील मनपा कत्तलखाना येथे गाय बैल यांच्या कत्तलीबाबत गेले होते. मागील वर्षी त्यांनी याच मुद्यावर समतानगर परीसरात तणाव निर्माण केला होता. त्यांचे भितीने समतानगर परिसरातील दुकानदारांमध्ये गोंधळ उडून त्यांनी आपली दुकाने बंद केली होती. वगैरेबाबत एका अनोळखी इसमाने दि. २३/१०/२००१ पोलीस नियंत्रण कक्ष व वानवडी पो. स्टे. येथे फोन केल्याने त्याप्रमाणे तेथे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा स्टाफ पाठवून त्या भागातील तणाव कमी करण्यात येऊन त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला होता. वरील प्रकाराबाबत वानवडी पो. स्टे. येथे स्टेशन डायरी नोंद क्रमांक २३/२००१ दिनांक २३/१०/२००१ रोजी १७.५५ वा. करण्यात आली आहे.

दिनांक ९/३/२००१ रोजी पुणे शहराचे मध्यवस्तीमध्ये अचानक दंगल उसळली होती. सदरची दंगल ही स्टुडंटस इस्लामिक मुव्हमेंट ऑफ इंडिया च्या कार्यकर्त्यांनी केल्याचे आढळून आले आहे. सदर दंगलीचा सूड म्हणून काहीतरी तात्कालीन कारण शोधून नि.स्था.इसम हा पुणे शहरात जातीय तणाव निर्माण करण्याची शक्यता आहे.

www.cjp.org.in

तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील सध्याचे युध्दजन्य परिस्थितीचा फायदा घेवून नि.स्था.इसम हा हिंदू व मुस्लीम समाजामध्ये तेढ निर्माण करेल असे आम्हास वाटते.

/- तरी नि.स्था. इसम मिलींद रमाकांत एकबोटे वय ४२ रा.११७०/३३ शिवाजी नगर पुणे हा कट्टर जातीयवादी गुंड असून तो आडदांड व खुनशी प्रवृत्तीचा आहे. त्याच्या जाती-जातीमध्ये तेढ निर्माण करणा-या कृत्यांना वेळीच आवर घालणे आवश्यक आहे त्या करिता त्याचे विरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टी दादा, हातभट्टीवाले, औषधीद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याची अधिनियम सन.१९८१ (सुधारणा १९९६) अन्वये ''धोकादायक व्यक्ती'' म्हणून स्थानबध्द करण्यात यावे. अगर कसे याबाबत जेष्ठ पोलीस अभियोक्ता पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे यांचे कडून अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

०/- सदर प्रस्तावाची कागद पत्रे अभिप्राय मिळणेकामी जेष्ट पोलीस अभियोक्ता, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे यांचेकडे पाठविणेबाबत आदेश होणे आवश्यक आहे. सोबत मुळ प्रस्तावाची कागदपत्रे सादर केली आहेत.

(signature)

**पोलीस निरीक्षक पी.सी.बी.**

११) सहा. पोलीस आयुक्त गुन्हे-२/-

इसम नामे मिलिंद रमाकांत एकबोटे याचे विरुद्ध MPDA अंतर्गत कारवाई करणे बाबत अभिप्राय मिळणे विनंती आहे

(signature)
ACP Crime 30/10

१२) जेष्ठ पोलीस अभियोक्ता,

पुढील पानावर -

www.cjp.org.in

| क्र. | तपशील | | शेरा |
|---|---|---|---|
| १२) | जेष्ठ पोलीस अभियोक्ता - | | |
| | I have gone through the entire proposal against the proposed detenu. There are serious offences registered against the P.D. such as communal riots, spreading hatred between Hindu / Muslim community, terrorising Muslim people including businessmen legally authorised in slaughtering of cattles, without any authority by the proposed detenu, pressurising Bodi manufactures to delete the names of "Sambhaji Maharaj" & thereby indulging in communal & criminal activities, which are hazardous to the maintenance of public order & it is noticed from the criminal record of the P.D. that because of his such prejudicial activities, the even tempo of the society is disturbed. The offence levelled against P.D. includes offences u/s 153 (a)(b), 120(b), 143, 147, 148, 149, 151, 186, 297, 116, & Press-Registration of Books Act etc. which clearly speak about the P.D. being a communalist. Considering all these factors, proposal can be initiated against the proposed detenu under M.P.D.A. Act 1981. | | |
| | Sr. P.P. & L.A. ACP APP 30/10 | | |
| १३) | पोलीस निरीक्षक पीसीबी - | | |
| | प्रस्तुत प्रकरणाबाबत जेष्ठ पोलीस अभियोक्ता यांचा अभिप्राय घेऊन या सोबत सादर केला आहे. | | |

www.cjp.org.in

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १४) | ~~सह पोलीस आयुक्त गुन्हे~~-२/-<br>वरील मा. उपायु- अभिप्रायांशी [illegible]<br>सदर [illegible] स्थानबद्धतेचा प्रस्तावाचे<br>अवलोकन करून आवश्यक दिले असून सदरचा<br>आदेश अवलोकनार्थ व आदेशार्थ सादर करीत<br>आहोत. [signature]<br>ACP क्राईम II 3/11 | |
| १५) | अपर पोलीस आयुक्त गुन्हे-<br>I have gone through the proposal very carefully. This is a fit case for detention under the MPDA. The proposal may kindly be approved.<br>I have also seen and wherever necessary corrected the ~~grounds~~ drafts of 'grounds for detention', 'committal order', 'detention order' and a letter to the Govt. The same may also be approved.<br>[signature] 1/11/2001. | |
| 16 | C.P. | He is a rank communalist. I am subjectively satisfied. Grounds be retyped as corrected 2/11 |

| क्र | तपशील | संकी. |
|---|---|---|
| 17 | Addl C.P (Crime) | |
| | The corrected documents have been retyped. The same may kindly be signed. | |
| | 3/11/2001. | |
| 18. | CP. | |
| | Commissioner SID & DG are of the views that in view of the communal situation in the state and possibility of repercussions in Rural areas/ Satara dist, we may wait. | |
| | Addl CP to keep this file in personal custody. | |
| | 3/11 | |
| | Addl CP (Crime) | |

www.cjp.org.in